**पोलीस अधीक्षक, सातारा यांचे कार्यालय**
933 मल्हारपेठ,सातारा 4150020
दूरध्वनी क्रमांक.02162-233833, फॅक्स क्रमांक- 02162-230232
ई-मेल-sp.satara@mahapolice.gov.in

---

जा.क्र.पशा-6/अल्पोपहार व भोजन,द.पत्रक/2025 सातारा, दिनांक :- ई-स्वाक्षरीत नमूद

---

## जाहीर निविदा

**विषय** :- कार्यालयातील आयोजित बैठकीदरम्यान उपस्थितांना चहा, नाष्टा/जेवण पुरवणिकामी बंद लिफाफयात दरपत्रके सादर करणे बाबत.

00000

उपरोक्त विषायान्वये, पोलीस अधीक्षक सातारा यांचे अधिपत्याखालील विविध बैठका, पोलीस भरती, विविध बैठका विविध प्रकारचे बंदोबस्ताचे अनुषंगाने आयोजीत बैठका, सेवातंर्गत प्रशिक्षण तसेच कायदा व सुव्यवस्थेबाबतचे बंदोबस्ताचे वेळी मागणी नुसार चहा, अल्पोपहार व भोजन (शाकाहारी/मांसाहारी) उधारीवर क्रेडीटवर पुरवठा करण्यास इच्छुक नोंदणीकृत पुरवठादार यांनी खालील नमूद केलेल्या अटी शर्तीचे अधिन राहून **दिनांक 25/11/2025** पर्यंत दरपत्रक सिलबंद लिफाफयात पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा येथील नोंदणी शाखेत आणून दयावीत.

### अ. कामाचे स्वरुप

पोलीस अधीक्षक कार्यालयाचे आदेशानुसार मागणी प्रमाणे वेळोवेळी अधिकारी/ कर्मचारी यांना चहा, विविध प्रकारचा अल्पोपहार व भोजन (शाकाहारी/मांसाहारी) पुरविणेचे आहे

सदरचा नाष्टा/जेवणाचे दर प्रति ताटास खालील तक्यात देणेत यावे.

| अ.क्र. | तपशिल | दर प्रति प्लेट (जीएसटीसह) |
|---|---|---|
| 1 | चहा | |
| 2 | नाष्टा - (शिरा,उपीट,पोहे, इत्यादी) | |
| 3 | नाष्टा - (इडली,उडीद वडा,कटलेट,पॅटीस इत्यादी) | |
| 4 | शाहाकारी जेवण गोड पदार्थासह | |
| 5 | मांसाहारी जेवण,(चिकण) चपाती/भाकरी | |
| 6 | मांसाहारी जेवण,(मटण) चपाती/भाकरी | |
| 7 | फुड पॅकेट | |

**टिप :- नाष्टा,शाहाकारी जेवण व मांसाहारी जेवणामध्ये समाविष्ट करण्यात येणारे पदार्थांचा उल्लेख दरपत्रकात नमूद करण्यात यावा.**

**अ) अटी व शर्ती**

1. दरपत्रक सादर करणारी व्यावसायिक कंपनी ही सातारा नगरपरिषद हद्दीतील स्थानिक असल्यास प्राधान्य दिले जाईल.
2. दरपत्रक सादर करणा-या कंपनीने/पुरवठादार यांनी नोंदणी प्रमाणपत्र, अन्न व औषधे यांचेकडील परवाना, पॅन नंबर,सेवाकर/आयकरासंबधीचे साक्षांकित केलेली कागदपत्रे दरपत्रकासोबत सादर करणे आवश्यक राहील.
3. सदर कामाचा करारनामा हा कार्यादेश मिळालेपासून 11 महिन्याचे कालावधी करिता ग्राहय राहील. (11 महिने) सदर कराराचा कालावधी वाढविणेचा/कमी करणेचा तसेच (चहा, नाष्टा, जेवण) समाधानकारक नसल्यास करार रद्द करण्याचा अधिकार पोलीस अधीक्षक सातारा यांना राहिल.
4. मंजूर पुरवठादार करारनामा करतेवेळी रुपये 30,000/- (अक्षरी रुपये तीस हजार फक्त) अनामत रक्कम धनाकर्षाने अथवा राष्ट्रीयकृत बॅकेच्या गॅरंटी स्वरुपात भरणा करावी लागेल. सदरची अनामत रक्कम बिनव्याजी राहिल.
5. प्रस्तुतचा करार हा दरपत्रक स्विकृत झालेल्या दिनांकापासून 11 महिन्याकरीता राहिल. मंजूर पुरवठाधारकास दरपत्रक मंजूर झाल्यापासून 10 दिवसाचे आत कार्यालयाशी अटी व शर्ती तसेच कार्यालयास व मंजूर पुरवठादारास मान्य होतील अशा अटी व शर्तीवर करारनामा करावा लागेल.
6. पुरवठादार यांचे नाव कोणत्याही काळया यादी मध्ये असता कामा नये.
7. चहा, नाष्टा व जेवण तयार करणारे कुक/वाढपे हे प्रशिक्षीत असणे आवश्यक असून ते गणवेषात हजर राहणे आवश्यक आहे.
8. सदर दरपत्रक अटी व शर्ती यामध्ये बदल करण्याचा अधिकार तसेच निविदा प्रक्रियेतील काही भाग अथवा पुर्ण दरपत्रक प्रक्रिया कोणतेही कारण नमूद न करता अगर पूर्व सूचना न देता रद्द करणेचा अधिकार पोलीस अधीक्षक सातारा हे राखून ठेवित आहेत.
9. संबंधित पुरवठादार कंपनीने शासन निकषान्वये कामगारांच्या वयोमर्यादेनुसार कामगार नेमावेत. बालकामगारांची नेमणूक करता येणार नाही.
10. पोलीस भरती, ज्ञानेश्वर पालखी वारी, निवडणूक, यात्रा बंदोबस्तामध्ये अनेकदा कर्मचा-यांना जेवणासाठी जागा सोडणे शक्य होत नाही. त्यांना बंदोबस्ताच्या ठिकाणी पॅकेट स्वरुपात जेवण पुरवावे लागते तरी ते पुरविण्याची व्यवस्था संबंधीत निविधाधारकास करावी लागेल. त्याकरिता वेगळे शुल्क अदा केले जाणार नाही. व वाहतूक खर्चही वेगळा दिला जाणार नाही. तसेच Packing योग्य प्रकारचे आरोग्यास हानिकारक नसणा-या वेष्टनामध्ये देणे आवश्यक राहील. या अटीचा भंग झाल्यास देय रक्कम (Payment) अदा केले जाणार नाही. प्रसंगी करार रद्द केला जाईल. तसेच योग्य तो दंड (penalty) केला जाईल.
11. कामगारांच्या आरोग्य विषयक व त्यांच्या सुरक्षतेतेची हमी संबंधित पुरवठादार कंपनीची राहील.
12. पुरविणेत येणारे अन्न पदार्थ दर्जेदार पध्दतीने करुन घेवून पुरविणेसाठी आपले वतीने पर्यवेक्षकाची नेमणूक करावी लागेल. त्याचे मानधन संबंधित ठेकेदाराने करावयाची आहे. सदर पर्यवेक्षकांकडे भ्रमणध्वनी असावा. व त्याचा क्रमांक या कार्यालयास कळवावा.
13. आपले तर्फे नियुक्त करण्यात येणा-या कामगारांचे प्रोव्हिडंट फंड/ विमा रक्कम / औषधोपचाराचा खर्च इत्यादीबाबतच्या रक्कमा भरण्याची /अदा करण्याची जबाबदारी संबंधित पुरवठादार यांची राहील. सदर बाबत या कार्यालयाची कोणतीही जबाबदारी राहणार नाही. अथवा त्यासाठी कोणत्याही स्वरुपाची अतिरिक्त रकमेची मागणी आपणास करता येणार नाही. सदरची कामे तात्पुरत्या स्वरुपाची निविदा कालावधीमधील असल्याने कामगारांना नियमित शासकीय कर्मचा-याप्रमाणे कोणतेही हक्क राहणार नाही.
14. दरपत्रकात नमूद केलेली रक्कम ही प्रचलित सर्व कर उदा. जीएसटी सेवाकर वैगरे गृहीत धरुन नमूद करण्यात यावी. त्यासाठी कोणतीही अतिरिक्त रक्कमेची मागणी करता येणार नाही.
15. जेवण किंवा नाष्टा पुरविण्याचा आदेश दिलेनंतर 12 तासात पुर्तता करावी लागेल.

**ब) <u>दरपत्रक दाखल करण्याची पध्दती -</u>**

दरपत्रक मोहोरबंद व्दिलिफाफा पध्दतीने दाखल करावयाची असून तांत्रिक लिफाफा नं.1 मध्ये कंपनीची माहिती आवश्यक त्या कागदपत्रासह सादर करावयाची असून मुख्य लिफाफा (दरपत्रक) नं.2 मध्ये दरपत्रक सादर करणे आवश्यक राहील. सदर दोन्ही लिफाफे सिलबंद करुन त्यावर अनुक्रमे "पोलीस अधीक्षक कार्यालय चहा,अपोल्पोपहार जेवण पुरवठा वार्षीक करार दरपत्रक" असे नमुद करुन लिफाफा क्र.1 व लिफाफा क्र.2 असे लिहावे. दोन्ही लिफाफे कार्यालयात निर्धारित केलेल्या कालावाधी व वेळेपूर्वी विहित पध्दतीने पोलीस अधीक्षक, सातारा या पत्यावर पाठविण्यात याव्यात.

**लिफाफा नं.1 मध्ये खालील प्रमाणे माहिती सादर करावी.**

| | | |
|---|---|---|
| 1 | व्यावसायिकाचे नाव | |
| 2 | पूर्ण पत्ता | |
| 3 | पुरवठादार कंपनीचे व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र (Company in Corpotion/Shop Act)/ ग्रामपंचायत व्यवसाय नाहरकत दाखला | |
| 4 | भागीदाराची नावे व पत्ता (असल्यास) | |
| 5 | दरपत्रक संबधी संपर्क साधावयाच्या व्याक्तीचे नाव,पत्ता दुरध्वनी क्रमांक | |
| 6 | पॅन क्रमांक | |
| 7 | आयकर भरल्याबाबतचे प्रमाणपत्र | |
| 8 | दरध्वनी क्रमांक | |
| 9 | ई-मेल | |
| 10 | फॅक्स क्रमांक | |
| 11 | दरपत्रक सादर करणारे पुरवठादार कंपनी किंवा त्यांचे मालक यांचेवर कोणत्याही सरकारी किंवा निमसरकारी कार्यालयामध्ये फसवणूकीची /गैरव्यवहाराची किंवा भ्रष्टाचाराची कोणतीही चौकशी चालू/प्रंलबित नसली पाहिजे. तसेच निविदाकार कंपनीची समावेश सरकारी काळया यादीत नसला पाहिजे. अशा प्रकारचे प्रतिज्ञापत्र रुपये 500/- च्या स्टॅम्पवर देणे बंधकारक आहे | |
| 12 | अनुभवी कर्मचारी यांची संख्या | |
| 13 | बयाणा रकमेचा तपशिल ( धनाकर्ष क्र.व दिनांक रक्कम रु.30,000/- ) | |

**<u>लिफाफा क्रमांक :- 2</u>**

व्यवसायीक माहिती संबंधित पुरवठादार लेटर हेडवर छापील स्वरुपात सही व शिक्यानिशी द्यावयाची आहे. चहा,नाष्टा/जेवणाचे दर प्रति ताटास खालील तक्यात देणेत यावे.

| अ.क्र. | तपशील | दर प्रति प्लेट (जीएसटीसह) |
|---|---|---|
| 1 | चहा | |
| 2 | नाष्टा - (शिरा,उपीट,पोहे इत्यादी) | |
| 3 | नाष्टा - (इडली,उडीद वडा,कटलेट,पॅटीस इत्यादी) | |
| 4 | शाहाकारी जेवण गोड पदार्थासह | |
| 5 | मांसाहारी जेवण,(चिकण) चपाती/भाकरी | |
| 6 | मांसाहारी जेवण,(मटण) चपाती/भाकरी | |
| 7 | फुड पॅकेट | |

A) दरपत्रकातील सर्व दर हे सर्व करांसह असावेत. कर रचना बदलल्यास त्यासाठी वेगळे पैसे देण्यात येणार नाहीत याची नोदं घेण्यात यावी.
B) दरपत्रका संदर्भातील सर्व निर्णय पोलीस अधीक्षक, सातारा हे घेतील व ते सर्व निविदाकार यांचेवर बंधनकारक असतील.
C) कोणतेही दरपत्रक मंजूर अथवा ना मंजूर करण्याचा हक्क तसेच कोणतेही कारण न देता दरपत्रकाची सूचना पुढे ढकलणे अथवा रद्द करणे याचे अधिकार पोलीस अधीक्षक, सातारा यांनी राखून ठेवली आहे. तसेच अशा मंजूर किंवा नामंजूर पुरवठादार यांना कोणतेही स्पष्टीकरण पोलीस अधीक्षक, सातारा इतर पुरवठादार देणार नाही.
D) दरपत्रकामधील दर हे संपूर्ण करार कालावधीसाठी बंधनकारक असतील. कोणत्याही कारणाने त्यामध्ये वाढ देण्यात येणार नाही.
E) ज्या पुरवठादाराचे लिफाफा 1 तांत्रिक दरपत्रक सर्व कागदपत्रासह मंजूर होईल व दर कमी असतील अशा पुरवठा धारकाचे दरपत्रक उघडण्यात येईल, याची नोंद घेण्यात यावी.
F) उपरोक्त नमुद केलेल्या पध्दतीने सादर न झालेल्या दरपत्रक नाकारण्यात येतील याची कृपया नोंद घ्यावी.
G) दरपत्रकातील प्रत्येक पान हे कंपनीने अधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने साक्षांकित करणे आवश्यक राहिल.

**<u>पोलीस अधीक्षक यांचे मान्यतेने</u>**

Digitally signed by
Atul Achyut Sabnis
Date: 13-11-2025
16:47:19

**( अतुल सबनीस )**

पोलीस उप-अधीक्षक (मुख्यालय), सातारा

प्रत - पोलीस निरीक्षक, सायबर पोलीस ठाणे, सातारा

2/- उपरोक्त निविदा / जाहिरात सातारा जिल्हा पोलीस दलाचे अधिकृत संकेतस्थळावर (www.satarapolice.gov.in) दिनांक 25/11/2025 रोजी 1900 वाजेपर्यंत प्रसिद्ध करण्यात यावी.